# बृहन्मुंबई महानगरपालिका

क्रमांक प्रअ/विनि/ ३५७२५ /साधारण, दि.२२.०३.२०१९

**परिपत्रक क्र. प्रअभि/विनि/ ६१ /साधारण**
**२०१८-१९**

विषयः बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदींनुसार विविध विकास कामांसाठी परवानगी देण्याकरिता आणि विकास हक्क प्रमाणपत्र देण्याकरिता व त्याची पुर्नविधीग्राहता करण्याकरिता छाननी शुल्काची पुनर्रचना करण्याबाबत.

महानगरपालिकेने ठराव क्रमांक ९२३ दि.२३.११.२०१७ नुसार सोबत जोडलेल्या परिशिष्ट-१ मध्ये दिलेल्या पुनर्रचित शुल्काची अनुसूची सन २०१७-१८ करिता महानगरपालिकेची मंजुरी प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून सुधारित दरानुसार शुल्क आकारण्यास, तसेच सन २०१७-१८ नंतर येणाऱ्या पुढील प्रत्येक आर्थिक वर्षात १ एप्रिलपासून पुढील नविन धोरण निश्चित होईपर्यंत विद्यमान किमान छाननी शुल्कामध्ये १० % इतकी वाढ करुन येणारी रक्कम (सुधारित शुल्कदर) पुढील दहा रुपयांच्या पूर्णांकात लागू करण्याबाबत व प्रती चौ.मीटर छाननी तसेच प्रपत्र शुल्कदरात १० % इतकी वाढ करुन येणारी रक्कम अपूर्णांकात असल्यास पुढील रुपयांच्या पूर्णांकात लागू करण्याबाबत मंजुरी प्राप्त झाली आहे.

त्यानुसार महानगरपालिकेच्या मंजुरी दिनांकापासून म्हणजेच दि.२३.११.२०१७ पासून सुधारित दर लागू करण्याबाबतचे परिपत्रक क्र.प्रअभि/विनि/२४५७०/साधारण दि.१५.१२.२०१७ नुसार निर्गमित करण्यात आले आहे. तसेच, सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता दि.०१.०४.२०१८ पासूनच्या सुधारित दराबाबत परिपत्रक क्र.प्रअ/विनि/३६९५०/साधारण दि.३१.०३.२०१८ अन्वये निर्गमित करण्यात आले आहे.

आता, सन २०१९-२० करिता दि.०१.०४.२०१९ पासून सोबत जोडलेल्या परिशिष्ट-१ मध्ये नमूद केल्यानुसार सुधारित दर लागू करण्यात आले आहेत.

| सही/- (१९.०३.२०१९) | सही/- (१९.०३.२०१९) | सही/- (२०.०३.२०१९) |
|---|---|---|
| कार्यकारी अभियंता<br>(विकास नियोजन) शहर | उप प्रमुख अभियंता<br>(विकास नियोजन)-१ | प्रमुख अभियंता<br>(विकास नियोजन) प्र. |

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## परिशिष्ट - १

## छाननी शुल्कांची अनुसूची

अ. प्रस्तावित आणि विद्यमान छाननी शुल्कांच्या श्रेणीचा तपशील.

| अ.क्र. | बाब | दि. ०१.०४.२०१८ पासून लागू केलेले दर | सन २०१९-२० या वर्षाकरिता दि.०१.०४.२०१९ पासून लागू करण्यात आलेले दर (महानगरपालिका ठराव क्र.९२३ दि.२३.११.२०१७) |
|---|---|---|---|
| १. | सर्व आरक्षणांच्या बाबतीत विकास हक्क प्रमाणपत्र देणे. | किमान रु.६८८०/- सापेक्ष टीडीआर क्षेत्राच्या प्रति चौ.मी. ला रु. ५३/- | किमान रु.७५७०/- सापेक्ष टीडीआर क्षेत्राच्या प्रति चौ.मी.ला रु.५९/- |
| २. | संस्कृती वारसाच्या सर्व बांधकामांकरिता विकास हक्क प्रमाणपत्र देणे. | वरील प्रमाणे | वरीलप्रमाणे |
| ३. | विकास नियंत्रण नियमावली ९१ नियम क्र.९ तक्ता क्र.४ अन्वये समायोजन आरक्षणांच्या बाबतीत (ॲकमोडेशन रिझर्वेशन) विकासाची परवानगी देणे. | किमान रु.६२००/- सापेक्ष भूखंडाच्या क्षेत्रफळाच्या प्रति चौ.मी. ला रु. १५/- | किमान रु.६८२०/- सापेक्ष भूखंडाच्या क्षेत्रफळाच्या प्रति चौ.मी. ला रु. १७/- |
| ४. | विकास नियंत्रण नियमावली १९९१ च्या नियम क्र. ५६, ५७, ५८ व १३ मधील तरतूदींनुसार औद्योगिक पट्टयातील जमिनींवर निवासी / व्यावसायिक विकासास परवानगी देण्याचा प्रस्ताव. | नियमावली क्र. ५६, ५७, व १३ मधील तरतुदींनुसार औद्योगिक पटटयातील जमिनींवर निवासी /व्यावसायिक विकासास परवानगी देण्याकरिता किमान रु.६,२००/- सापेक्ष भूखंडाच्या क्षेत्रफळाच्या प्रति चौ.मी. ला रु.१५/- आणि विकास नियंत्रण नियमावली, | नियमावली क्र. ५६, ५७, व १३ मधील तरतुदींनुसार औद्योगिक पटटयातील जमिनींवर निवासी /व्यावसायिक विकासास परवानगी देण्याकरिता किमान रु.६,८२०/- सापेक्ष भूखंडाच्या क्षेत्रफळाच्या प्रति चौ.मी. ला रु.१७/- आणि विकास नियंत्रण नियमावली, १९९१ च्या नियम क्र.५८ मधील तरतुदींनुसार सुती कापड गिरण्यांच्या पुर्नविकासास परवानगी देण्याकरिता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | १९९१ च्या नियम क्र.५८ मधील तरतुदींनुसार सुती कापड गिरण्यांच्या पुर्नविकासास परवानगी देण्याकरिता किमान रु.१३,४१०/- सापेक्ष भूखंडाच्या क्षेत्रफळाच्या प्रति चौ.मी. ला रु.३२/- | किमान रु.१४,७६०/- सापेक्ष भूखंडाच्या क्षेत्रफळाच्या प्रति चौ.मी. ला रु.३६/- |
| ५. | शैक्षणिक आणि वैद्यकीय सुविधांकरिता आरक्षित असलेल्या जमिनीच्या विकासास परवानगी देण्याचा प्रस्ताव. | किमान रु.४,१३०/- सापेक्ष भूखंडाच्या क्षेत्रफळाच्या प्रति १० चौ.मी. ला रु.२६/- | किमान रु.४५५०/- सापेक्ष भूखंडाच्या क्षेत्रफळाच्या प्रति १० चौ.मी. ला रु.२९/- |
| ६. | झोपडपटटी पुनर्वसन प्रकल्पांच्या बाबतीत विकास हक्क प्रमाणपत्र देणे. | किमान रु.६,२००/- सापेक्ष टी.डी.आर. क्षेत्राच्या प्रति चौ.मी. ला रु.२६/- | किमान रु.६,८२०/- सापेक्ष टी.डी.आर. क्षेत्राच्या प्रति चौ.मी. ला रु.२९/- |
| ७. | विकास नियंत्रण नियमावली १९९१ नियम ११(४) मधील तरतूदींनुसार विकास नियोजन आरक्षण / सुविधेकरिता (आरक्षित) भूखंडांचे पुनर्स्थापन करण्याकरिता परवानगी देणे. | प्रति प्रस्तावाकरिता रु.१०,३२०/- इतका ठोक आकार. | प्रति प्रस्तावाकरिता रु.११,३६०/- इतका ठोक आकार. |
| ८. | विकास नियंत्रण नियमावली क्र.६७ अन्वये विकासाकरिता परवानगी देण्याकरिता म्हणजे संस्कृती वारसा समितीकडून निर्वाळा मिळण्याच्या प्रस्तावाकरिता छाननी शुल्क | प्रति प्रस्तावाकरिता रु.४,१३०/- इतकी ठोक रक्कम | प्रति प्रस्तावाकरिता रु.४,५५०/- इतकी ठोक रक्कम |

(ब) **वरील (अ) १ ते ६ करिता पुनर्विधीग्राह्यता शुल्क**

१) (अ) १, २ व ६ प्रकरणी जारी केलेली विकास हक्क प्रमाणपत्रे ५ वर्षाकरिता विधीग्राहय राहतील आणि त्यानंतर पुढील ५ वर्षाकरिता तत्कालिन छाननी शुल्काच्या १० टक्के दराने पुनर्विधीग्राहय शुल्क वसूल करुन पुनर्विधीग्राहय केली जातील. अनुक्रमे १ , २ व ६ प्रकरणी तत्कालिन किमान शुल्क हे प्रत्येक वर्षी तत्कालिन किमान शुल्कात १० टक्के वाढ करुन येणा-या रक्कमेएवढे असेल.

२) बाब क्र. (अ) ३, ४ व ५ अन्वये दिलेल्या विकासाच्या परवानगीसंबंधी येथे नमूद करण्यात येते की, सदर परवानगी २ वर्षांच्या कालावधीकरिता विधीग्राहय राहील आणि त्यानंतर २ वर्षाकरिता तत्कालिन छाननी शुल्काच्या १० टक्के दराने पुनर्विधीग्राहय शुल्क वसूल करुन पुनर्विधीग्राहय करता येईल. तसेच तत्कालिन किमान शुल्कात दरवर्षी १० टक्के दराने वाढ होईल.

(क) विकास हक्क प्रमाणपत्राच्या वापराकरिता छाननी शुल्क

(अ) १,२ व ६ करिता किमान रु.७,५७०/- सापेक्ष टी.डी.आर. क्षेत्रफळाच्या प्रति चौ.मी.ला रु.५९/- या दराने वापर शुल्क आकारले जाईल.

(ड) **विकास हक्क प्रमाणपत्राचे हस्तांतरण**.

विकास हक्क प्रमाणपत्राच्या हस्तांतरणाकरिता वरील (अ) १, २ करिता किमान रु. ७,५७०/- सापेक्ष टी.डी.आर. भूखंडाच्या क्षेत्रफळाच्या प्रति चौ.मी.ला रु.५९/- या दराने छाननी शुल्क आकारले जाईल व वरील (अ) ६ प्रमाणे किमान रु.६,८२०/- सापेक्ष टी.डी.आर. भूखंडाच्या क्षेत्रफळाच्या प्रति चौ.मीटरला रु.२९/- या दराने हस्तांतरण शुल्क आकारले जाईल.

विकास हक्क प्रमाणपत्राचे हस्तांतरण कायदेशीर वारसाला करण्याकरिता प्रत्येक हस्तांतरणाला रु.४,५५०/- या ठोक रकमेने (दराने) छाननी शुल्क आकारले जाईल.

(इ) **विकास हक्क प्रमाणपत्र , अर्ज प्रपत्र, हस्तांतरण प्रपत्र, वापर प्रपत्र.**

विकास हक्क प्रमाणपत्राच्या अर्ज प्रपत्राकरिता रु.२४२/- अधिक मूल्यवर्धीत कर (Vat) आकारले जाईल. हस्तांतरण प्रपत्र/वापर प्रपत्र याकरिता रु.४९/- अधिक मूल्यवर्धित कर (Vat) त्याचप्रमाणे वेळोवेळी शासनाकडून लागू करण्यात येणारे याप्रकारचे कर आकारण्यात येतील. सदर आकारणी वसूल करणे सोईचे व्हावे यादृष्टीने शुल्क वाढ प्रस्ताविली आहे.

| | | |
|---|---|---|
| सही/- (१९.०३.२०१९) | सही/- (१९.०३.२०१९) | सही/- (२०.०३.२०१९) |
| **कार्यकारी अभियंता** | **उपप्रमुख अभियंता** | **प्रमुख अभियंता** |
| **विकास नियोजन(शहर)** | **(विकास नियोजन)-१** | **(विकास नियोजन)प्र.** |

D:\DP-8-2018\Scrutiny fees.doc